5-09-2021-Dai-02_DH_PAN_28_04_2016-2.qxp 05-09-2021 AM 12:12 Page 1





नवनाथ परब, अमित नाईक, सुनील डिचोलकर, मनोज शिरोडकर, अनंत बखले



ब्लिवन अँस्ट्रासिओ, शैलेश मडकईकर, संपादक राजेंद्र देसाई, भानुदास तलवार, जोसेफ फर्नांडिस



रंजना पंडित व कुटुंबीय



श्वेता कामत, विभा वर्मा



अनुज व विजय भादवणकर



गौरेश नाईक



भास्कर देसाई

# दाबोळीत 'श्रावण धारा'

वास्को, दि.४ (प्रतिनिधी) :

दाबोळी भाजप महिला मोर्चातर्फे नवेवाडे येथे पंचायतमंत्री माविन गुदिन्हो यांच्या कार्यालयाच्या सभागृहामध्ये 'श्रावण धारा' हा सांस्कृतिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाला मंत्री गुदिन्हो यांच्यासह गोवा राज्य महिला मोर्चा अध्यक्ष डॉ. शीतल नाईक, सरचिटणीस रंजीता पै, राज्य कार्यकारिणी सदस्य आशा मोरे, दक्षिण गोवा महिला मोर्चा सदस्य दीपाली चिपकर, दाबोळी भाजप महिला मोर्चा अध्यक्ष अनिता थोरात, सरचिटणिस सारिका नाईक, उपाध्यक्ष कल्पना राणे, खजिनदार शैलजा आसोलकर, दाबोळी भाजप मंडळ अध्यक्ष संदीप सूद, मुरगावच्या उपनगराध्यक्ष श्रध्दा महाले, दाबोळी मतदारसंघाचे प्रभारी जयंत जाधव आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचा शुभारंभ मंत्री गुदिन्हो यांच्या हस्ते करण्यात आला.

याप्रसंगी गायिका सिद्धी शेलार यांचा श्रावणावर आधारित मराठी व कोकणी भावगीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यांना रोहित बांदोडकर यांनी तबलासाथ केली. दाबोळी मतदारसंघातील महिलांसाठी पाककला व मेंहदी स्पर्धा घेण्यात आल्या.



वास्को : श्रावण धारा कार्यक्रमाचा शुभारंभ करताना मंत्री माविन गुदिन्हो. बाजूला डॉ. शीतल नाईक, रंजीता पै, श्रद्धा महाले, अनिता थोरात, संदीप सूद व जयंत जाधव. (अक्षंदा राणे)


**PUBLIC NOTICE**

**REVOCATION OF POWER OF ATTORNEY DTD. 24/10/2001**

This is to bring to the Notice of public at large that the Power of Attorney dated 24/10/2001, executed before Advocate & Notary Mr. N. M. Ansari, A-10/402, Sec 7, Shanti Nagar, Mira Road (E), Dist. Thane, executed by my clients Mr. Louis Baptista and Mrs. Eunice Baptista, both residents of B-2/501, Shambhunath Apartment, Vashi Faliya, Halar Road, Valsad 396001, Ta. Dist. Valsad, Gujarat, **property bearing Survey No. 217/27 of Assagao, Bardez, Goa admeasuring 850 sq. mts.** has been cancelled and revoked with immediate effect under the instructions of my clients. Any person/s hereafter dealing in the above said property will be solely responsible for the consequences and my clients will not be responsible in anyways.

Date: 31/08/2021

Sd/- **Manish N. Rana (Advocate & Notary)**
A/212-213, Aditya Chambers, 2nd Floor,
B/s New Fire Station, Opp. Valsad Rural Police Station
Station Road, Valsad 396 001


# चिखली वाहतूक बेटाजवळ वाढली झुडपे



वास्को : चिखली वाहतूक बेटाभोवती वाढलेली झुडपे. (अक्षंदा राणे)

- वाहनचालकांना त्रास
- साफसफाई करण्याची मागणी

वास्को,दि.४(प्रतिनिधी)

चिखली चौकातील वाहतूक बेटाच्या सभोवताली झुडपे वाढल्याने वाहनचालकांना विशेषतः दुचाकीचालकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. याप्रकरणी संबंधितांनी लक्ष घालून बेटाची साफसफाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

चिखली चौकात पूर्वी गोवा शिपयार्डने वाहतूक बेट उभारले होते. परंतु, त्यातील बांधकामामुळे वाहनचालकांना समोरून येणारी वाहने दिसत नव्हती. त्यामुळे बऱ्याच तक्रारी आल्यावर तेथील ते बांधकाम हटविण्यात आले. त्यानंतर तेथे वाहतूक बेटाचा आकार लहान करून सौंदर्यीकरण करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. परंतु, काही तांत्रिक कारणास्तव तेथील वाहतूक बेटाचे सौंदर्यीकरण होऊ शकले नाही. सध्या अपूर्णावस्थेतील वाहतूक बेट नजरेस पडत आहे. या वाहतूक बेटाजवळून दिवसाकाठी हजारो वाहने ये-जा करतात. मात्र या बेटाच्या सभोवती झुडपे वाढल्याने वाहनचालकांना त्रास होऊ लागला आहे. या बेटाला लावण्यात आलेल्या रेडियमच्या पट्ट्या वाढलेल्या झुडपामुळे रात्रीच्या वेळी नजरेस पडत नसल्याने अनोळखी वाहनचालकांची गैरसोय होत आहे.

पान १ वरून

## दैनिक हेराल्डवर शुभेच्छांचा वर्षाव

वळवईकर, अॅड. शिवाजी देसाई, ऋषिकेश सावंत, निलेश नाईक आणि कुटुंबिय (मेणकुरे), अपूर्वा ग्रामोपाद्धे यांनी कार्यालयात भेट देऊन शुभेच्छा दिल्या. दूरध्वनीवरून ट्रोजन डिमेलो, निता पृथ्वीराज जाधव, विवेक नाडकर्णी, प्रशांत आर्सेकर, पत्रकार राजू नायक, पत्रकार सागर जावडेकर, पत्रकार परेश प्रभू, पत्रकार गंगाराम म्हांबरे, पत्रकार अमर पाटील, बन्सीलाल शिरोडकर, पत्रकार नारायण देसाई, पत्रकार प्रभाकर ढगे, पत्रकार आशुतोष भांगले, प्रेमानंद नाईक, योगेश नागवेकर, सविदास नाईक, प्रशांत आर्सेकर, पत्रकार निवृत्ती शिरोडकर, पत्रकार विठोबा बगळी, अमोल नाईक आदींनी पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## पी. चिदंबरम पुन्हा सक्रिय

देशाचे खाजगीकरण हे धोकादायक

देशाचे होणारे खाजगीकरण हे या देशाचा मोठा शत्रू असून, त्यापासून देशाला खरा धोका असल्याचे लक्षात घेऊन सतर्क होणे गरजेचे आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी गेल्या ७० वर्षांत काँग्रेस पक्षाने काय केले, देशाचा कोणता विकास केला असा प्रश्न उपस्थित करीत आहेत तर दुसऱ्या बाजूला विकासाचे, प्रकल्पांचे खाजगीकरण करून विकास झाला असल्यावर शिक्कामोर्तब करीत आहेत. इतिहास पुसून टाकण्याचे काम सुरू आहे. अशा परिस्थितीत विविधतेने नटलेल्या या देशाला एकसंघ राखण्यासाठी काँग्रेस पक्षाने दिलेले योगदान लक्षात घेऊन सर्वांनी देश वाचविण्यासाठी एकसंघ होण्याची गरज असल्याचे निरीक्षक पी. चिदंबरम यांनी मडगावात सांगितले. मडगावातील दैवज्ञ सभागृहात मडगाव विधानसभा मतदारसंघातील कार्यकर्ते, पक्षाचे पदाधिकारी, विविध गट समित्या यांना संबोधित करताना पी. चिदंबरम बोलत होते. यावेळी व्यासपीठावर गोवा प्रभारी दिनेश राव, प्रकाश राठोड, मडगावचे आमदार तथा विरोधी पक्ष नेते दिगंबर कामत, गोवा प्रदेशाध्यक्ष गिरीश चोडणकर, एम. के. शेख, दक्षिण गोवा जिल्हा अध्यक्ष जोसेफ डायस, मडगाव पालिकेच्या उपनगराध्यक्ष दीपाली सावळ, मॉडेल मडगावचे नगरसेवक, मडगाव गटाध्यक्ष गोपाळ नाईक, इतर नेते, पदाधिकारी उपस्थित होते.

दिनेश राव म्हणाले की, गोव्यात सहा महिन्यांनी विधानसभा निवडणूक होणार आहेत व या निवडणुकीत मडगावचे आमदार दिगंबर कामत विजयी होतील याची १०० टक्के खात्री आहे. काँग्रेस पक्षाला बहुमत मिळावे यासाठी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन झटण्याचे आवाहन केले. विद्यमान भाजप सरकार हे भ्रष्टाचारी, अधर्मी असल्याचेही राव म्हणाले.

प्रदेशाध्यक्ष गिरिश चोडणकर म्हणाले की, काँग्रेस पक्ष गोव्यात सत्तेवर आल्यावर सहा महिन्यांत सक्षम असे लोकपाल विधेयक आणणार आहे. काँग्रेस पक्षाच्या नेत्यांनीही भ्रष्टाचार केला असेल तर त्यांनाही आत जावे लागणार असल्याचे चोडणकर म्हणाले.

विरोधी पक्षनेते दिगंबर कामत यांनीही कार्यकर्त्यांनी एकसंघ होऊन काँग्रेस पक्षाला सत्तेत आणण्यासाठी झटावे व गेल्या वेळी हुकलेली संधी यावेळी घ्यावी.

**देश वाचविण्याची संधी**

पुढील वर्षांत पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुका होणार असून, त्यावेळी काँग्रेस पक्षाला सत्तेत आणून देश वाचवण्याची संधी आहे. त्याची सुरवात फेब्रुवारी, २०२२ मध्ये होणाऱ्या गोवा विधानसभा निवडणुकीत व्हावी, असे आवाहनही चिदंबरम यांनी उपस्थितांना केले.

## ममता बॅनर्जी भवानीपूरमधून रिंगणात

निवडणूक आयोगाने आज (शनिवार) दुपारी ही माहिती दिली. पोटनिवडणुकीबाबत आयोगाने म्हटले आहे की, मतमोजणी ३ ऑक्टोबर रोजी केली जाईल. तसेच ३० सप्टेंबरलाच पश्चिम बंगालच्या समसेरगंज, जंगीपूर आणि पिपली मध्येही पोटनिवडणूक होणार आहे. तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख ममता बॅनर्जी भवानीपूरमधून निवडणूक लढवू शकतात. तसेच निवडणूक आयोगाने कोविड -१९ ची परिस्थिती पाहता इतर ३१ जागांच्या निवडणुका पुढे ढकलल्या आहेत.


**फिनिक्स टाऊनशिप लिमिटेड**

नोंदणीकृत कार्यालय, दुर्गा भवन, हेदे सेंटर, टोंका, पणजी, गोवा -४०३ ००१
ई-मेल - complaince@hbgindia.com संकेतस्थळ : www.hbginidia.com
सीआयएन - L67190GA1993PLC001327
अधिकृत भांडवल - रु. २८,००,००,०००
भाग भांडवल आणि अदा केलेले भांडवल - रु. २१,६८,०८,६८०

**सार्वजनिक सूचना - व्हीडीओ कॉन्फरन्स (व्हीसी) इतर ऑडीओ-व्हुज्यूअल (ओएव्हीएम) द्वारे कंपनीची २८वी वार्षिक आमसभा.**

याद्वारे सूचित करण्यात येत की, फिनिक्स टाऊनशिप लिमिटेड (कंपनी) च्या सदस्याची २८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) बुधवार, २९ सप्टेंबर, २०२१ रोजी दुपारी ०३.०० वाजता (आयएसटी) व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (व्हीसी) / इतर ऑडिओच्या (ओएव्हीएम) सेंट्रल डिपॉझिटर्स सर्व्हिसेस लिमिटेड (सीडीएसएल) यांनी पुरवलेल्या माध्यमातून आणि कंपनी कायदा, २०१३ यातील तरतूद आणि नियम, ८ एप्रिल २०२०, १३ एप्रिल २०२०, ५ मे २०२० आणि १३ जानेवारी २०२१ रोजीची परिपत्रके वाचा आणि कार्पोरेट अफेअर्स मंत्रालय (एमसीए परिपत्रके) यांनी पसृत केलेले आणि सिक्युरिटी अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (सेबी परिपत्रक) यांनी १२ मे २०२० रोजीचे परिपत्रक आणि १५ जानेवारी २०२१ पसृत केलेले परिपत्रकानुसार या आमसभेत व्यवसायाचा व्यवहार करण्यावर चर्चा होईल.

कंपनी किंवा डिपॉझिटरी पार्टिसिपन्टकडे ज्यांचे ई-मेल आयडी नोंदणीकृत आहेत अशांना २०२०-२१ या आर्थिक वर्षाच्या एजीएम आणि वार्षिक अहवालाची नोटीस इलेक्ट्रॉनिक पद्धतीने त्या भागधारकांना पाठविली जाईल. उपरोक्त दस्तऐवज कंपनीच्या संकेतस्थळावर http:/www.hbgindia.com आणि www.bseindia.com वर स्टॉक एक्सचेंजच्या वेबसाइटवर उपलब्ध असतील. एमसीएच्या परिपत्रक आणि सेबीच्या परिपत्रकानुसार एजीएमच्या नोटीसच्या कागदी प्रती आणि वार्षिक अहवालाच्या कोणत्याही प्रती कोणत्याही भागधारकांना पाठविल्या जाणार नाहीत.

ई-मेल पत्ते देणे आणि अद्यावतीकरण :

अ) प्रत्यक्ष मोडमध्ये शेअर्स असणाऱ्या सदस्यांना फोलिओ क्रमांक, सदस्यांचे नाव आणि स्वयं-प्रमाणितस्कॅन यासारख्या आवश्यक कागदपत्रांसह तक्रारीवर complaince@hbindia.com/prafulsadroitcorove.com/sandeeps@adroitcorporate.com वर ईमेल पाठविण्याची विनंती केली जात आहे. पॅन कार्ड किंवा आधार कार्डची प्रत त्यांच्या ईमेल पत्त्यावरून पाठवावी.

ब) डिमॅट मोडमध्ये समभाग असलेल्या सदस्यांना ई-मेल पत्त्याची नोंदणी करण्यासाठी संबंधित डिपॉझिटरी सहभागीशी संपर्क साधण्याची विनंती केली जात असून एजीएम दरम्यान रिमोट ई-वोटिंग आणि ई-मतदान करावे.

कंपनी भागधारकांना मतदान करण्यासाठी ई-मतदान सुविधा (रिमोट ई-मतदान) पुरवेल. एजीएम (ई-मतदान) दरम्यान ई-व्होटिंगद्वारे मतदानाची सुविधा. एजीएम दरम्यान समभागधारकांना रिमोट ई-मतदान आणि ई-व्होटिंगची प्रक्रिया इलेक्ट्रॉनिक मोड / फिजिकल मोडमध्ये पुरवली जाईल.

**द्वारा : फिनिक्स टाऊनशिप लिमिटेड**
**सही /-**
**रिचा जैन**
**कंपनी सचिव**

स्थळ : मुंबई
दिनांक : ४ सप्टेंबर २०२१


# ...त्यामुळेच शिवोलीची वाताहत

## अॅड. चंद्रकांत चोडणकर : शिवोली गटकाँग्रेसतर्फे कडधान्याचे वाटप

म्हापसा, दि. ४ (प्रतिनिधी) :

शिवोली मतदारसंघाच्या विकासाचा पाया हा आपल्या कारकिर्दीत तसेच काँग्रेस सरकारच्या काळात रचला गेला इतकेच नव्हे तर शिवोलीत प्रथमच अपक्ष म्हणून निवडून येण्याचा इतिहास माझ्यामुळेच घडला गेला. दुर्दैवाने त्यानंतर शिवोलीचे प्रतिनिधित्व करणाऱ्या लोकांना विकास कसा व कोणत्याप्रकारे करावा याचे भान न राहिल्याने आज शिवोली मतदारसंघाची वाताहात झालेली आपणास दिसून येते, असे शिवोलीचे माजी आमदार तथा माजी समाजकल्याण मंत्री अॅड. चंद्रकांत चोडणकर यांनी शिवोलीत सांगितले.

भाटी -शिवोली येथील श्री कालिका ब्राह्मण देवस्थानच्या प्रांगणात शिवोली गट काँग्रेसतर्फे आयोजित कडधान्याचे वाटप करण्याच्या कार्यक्रमात अॅड. चोडणकर बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर सामाजिक कार्यकर्ते दत्ताराम पेडणेकर, काँग्रेसचे प्रभारी बाबी बागकर, राज्य युथ काँग्रेसचे अध्यक्ष वरद म्हार्दोळकर, सरचिटणीस जनार्दन फडते, शिवोली युथ काँग्रेसचे अॅड. रोशन चोडणकर, संकल्प आमोणकर तसेच देवस्थानचे अध्यक्ष हनुमंत मांद्रेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

सामाजिक कार्यकर्ते पेडणेकर यांनी आपल्या भाषणात शिवोलकरांनी मागच्या निवडणुकीत व्यक्ती बदलून पाहिली परिस्थिती मात्र 'जैसे थे'च असल्याचे सांगतानाच आता इतिहासच बदलण्याची वेळ येऊन ठेपल्याचे सांगितले. राज्य प्रभारी बाबी बागकर, वरद म्हार्दोळकर तसेच रोशन चोडणकर यांनीही यावेळी आपले विचार मांडले. यावेळी सुमारे दीडशे स्थानिक महिलांना कडधान्याचे वाटप करण्यात आले. सूत्रसंचालन माजी गटाध्यक्ष राजेश कोचरेकर यांनी केले व त्यांनीच आभार मानले.



शिवोली : ग्रामस्थांना कडधान्याचे वाटप कार्यक्रमावेळी दत्ताराम पेडणेकर. सोबत माजीमंत्री चंद्रकांत चोडणकर, बाबी बागकर, संकल्प आमोणकर, वरद म्हार्दोळकर व इतर. ( रमेश नाईक )

# भूमिका विद्यालयात निसर्ग दिन

साखळी, दि. ४ (प्रतिनिधी) :

पर्ये-सत्तरी येथील श्री भूमिका शिक्षण संस्थेच्या श्री भूमिका उच्च माध्यमिक विद्यालयात 'निसर्ग दिन' साजरा करण्यात आला. यावेळी विद्यालयाच्या प्रांगणात जास्वदींच्या व आवळ्याच्या रोपट्याची लागवड करण्यात आली. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून पर्येचे सरपंच सखा सावंत उपस्थित होते. सन्माननीय पाहुणे म्हणून श्री भूमिका शिक्षण संस्थेचे व्यवस्थापक शिवाजीराव राणे, विद्यालयाचे प्राचार्य यशवंत सावंत, खास निमंत्रित शिक्षण संस्थेचे सचिव कुष्ठा राणे, खजिनदार शंकर च्यारी, ज्येष्ठ शिक्षक रावसाहेब राणे व इतर शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

सरपंच सखा सावंत यांच्या हस्ते जास्वदींचे रोपटे लावून शुभारंभ करण्यात आला. यावेळी सखा सावंत म्हणाले, शिक्षण संस्थेच्या आवारात फुलझाडे खूपच शोभून दिसतात व विद्यालयाला एक चांगले स्वरूप प्राप्त होते. विद्यालयात प्रवेश करताना मन प्रसन्न होते. तसेच आवळ्यासारखी झाडे ही औषधी झाडे आहेत. त्यामुळे ती सुद्धा खूपच महत्त्वाची आहेत.

यावेळी प्राचार्य यशवंत सावंत यांनीही आपले विचार व्यक्त केले. ते म्हणाले,वर्तमान आणि भविष्यातील पिढीचं हित साधण्यासाठी नैसर्गिक स्त्रोतांची सुरक्षितता,जतन आणि शाश्वत राहण्यासाठी निसर्ग दिन महत्वाचा आहे. तसेच नामशेष होत चाललेली झाडे आणि प्राण्यांच्या प्रजातींच्या रक्षणासाठी जागतिक निसर्ग संवर्धन दिन खूप महत्वाचा आहे.निसर्गाचा मानवाकडून होणारा ऱ्हास थांबवून नैसर्गित स्त्रोतांचं जतन करण्याबाबत जनजागृती करण्यासाठी आज विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. त्यानंतर इतर मान्यवरांच्या हस्ते झाडे लावण्यात आली.


केनरा बैंक Canara Bank
सिंडिकेट Syndicate (A GOVERNMENT OF INDIA UNDERTAKING)

**एआरएम शाखा पणजी,**
**पहिला मजला माथियस प्लाझा,**
**१८ जून रोड, पणजी, गोवा - ४०३००१**
दूरध्वनी क्र. ०८३२-२४२०६४७ मो. ९७४११५७७४६
ईमेल : cb5103@canarabank.com

संदर्भ : एआरएम : ५१०३३५:५५:२०२१-२२ दिनांक : ३०/०८/२०२१

**विक्री सूचना**

**सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ या कायद्यानुसार आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम २००२ च्या ८(६) मधील तरतुदीनुसार वाचन करून अस्थलांतरित मालमत्तेच्या विक्रीसाठी विक्री सूचना बजावण्यात आली आहे.**

याद्वारे समस्त जनता आणि प्रामुख्याने कर्जदार आणि हमीदार यांना सूचना देण्यात येते की खालील नमुदित अस्थलांतरित मालमत्ता सुरक्षित जमाकर्त्याकडे गहाण/ताब्यात असून सुरक्षित कर्जदाराच्या अधिकृत अधिकाऱ्याने या मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा घेतला आहे. ही मालमत्ता 'जिथे आहे तिथे', 'जशी आहे तशी', 'तिथे जे काही आहे ते' या तत्वानुसार **१४/१०/२०२१ रोजी सकाळी ११:०० ते सकाळी ११:३० दरम्यान रू. ४५,८१,०५७/- (पंचेचाळीस लाख ऐक्याऐंशी हजार सत्तावन रुपये) (३०/०६/२०२१ रोजी नुसार)** च्या वसुलीसाठी विकण्यात येणार आहे. कॅनरा बँकेला अधिक व्याजाची रक्कम इतर शुल्क आदी रक्कम सुरक्षित येणे आहे. मेसर्स व्ही अँड एन असोशिएटस, **घर नं. : - १०९, मैनाथ भट्टी, हडफडे, बार्देश, उत्तर गोवा - ४०३ ५१६ प्रतिनिधीत्व करणारे भागीदार (१) श्री. नाथा आर साखळकर (भागीदार), (२) श्री. विजयकुमार डी. हळर्णकर (भागीदार).**

मालमत्तेची राखीव किमंत **रु. ७०,१२,००० /- (रु. सत्तर लाख बारा हजार फक्त)** आणि मालमत्तेसाठी बयाणा रक्कम **रु. ७,०१,२००.०० (रु. सात लाख एम हजार दोनशे फक्त)**

बयाणा रक्कम दिनांक **१३/१०/२०२१ रोजी सायंकाळी ५:००** पूर्वी भरणे आवश्यक आहे. बोलीदारांनी वाढीव बोली **रु. २०,०००.०० (रु. वीस हजार फक्त)** या पटीतच बोलावी. लिलाव / बोली केवळ ऑनलाईन इलेक्ट्रानिक लिलाव पद्धतीने https://www.indian-bankseauction.com या संकेतस्थळाद्वारे **दि. १४/१०/२०२१ रोजी सकाळी ११:०० ते सकाळी ११:३०** या दरम्यान लावावी.

**ज्ञात असलेल्या बोजासह (असेल तर मालमत्तेचा पूर्ण तपशील)**

हडफडे गाव, मैनाथ भट्टी हडफडे, बार्देश, उत्तर गोवा येथील श्री. विजय कुमार डी. हळर्णकर यांची जमीन आणि इमारत, प्लॉट नं. ए, घर. नं. : - १०९, सर्वे नंबर २५/५, २५/१० आणि २५/६ मधील ५०५ चौरस मीटर क्षेत्रफळ.

**सीमारेषा :**
**पूर्वसह :** नाला
**दक्षिणेसह :** सर्व्हे २५/८ मधील प्लॉट
**उत्तरेसह :** सर्व्हे २५/७ आणि २५/११ मधील प्लॉट
**पश्चिमेसह :** सर्व्हे २/२४ आणि ९/२४ आणि १२/१४ मधील भागातील प्लॉट

ई-लिलाव प्रक्रियेतील विक्रीसंदर्भातील सविस्तर अटी आणि नियमांसाठी कृपया कॅनरा बँकेच्या (www.canarabank.com) या संकेतस्थळावर प्रदान केलेल्या बँक मालमत्तेची लिंक पहा. किंवा मुख्य व्यवस्थापक, एआरएम शाखा, कॅनरा बँक, फोन नं. ०८३२-२४२०६४७/२४२००५६, मो. + ९१ ९७४११५७७४६ येथे कामकाजा दिवशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

**दिनांक : ३०/०८/२०२१** **अधिकृत अधिकारी,**
**स्थळ : पणजी** **केनरा बँक**



**PUBLIC NOTICE**

It is hereby informed to the General Public that my client wish to purchase the property known as **"PURAN"** or **"XELLICHO CUNGO"** admeasuring an area of 9200 square meters bearing Survey No. 38, Sub Division No. 0 of Village Latambarcem of Bicholim Taluka situated at Village Latambarcem within the limits of Village Panchayat of Latambarcem, Taluka and Sub District of Bicholim, District of North Goa, State of Goa and is bounded as under:

On the North: By property bearing Survey No. 41; On the South: By Nallah; On the East: By Nulla and the property bearing Survey No. 40; On the West: By property bearing Survey No. 37.

It is therefore informed to the General Public that in case any person/s, bank/s, corporation/s, legal entity, any financial institution/s, company is / are having any kind of right / title / share / claim / interest over the said property either by way of inheritance, an agreement, lien, mortgage and / or sale deed / gift deed, collateral security, will, inventory, partition, co-ownership, adverse possession, easementory rights, mundkarial, tenancy, lease and / or any other rights etc, or otherwise and if any objection to the said proposed transaction in whatsoever manner should file his / her claim or objection at my office with all documentary evidence within a period of **FIFTEEN DAYS** from the date of publication of this notice, failing which my client shall proceed with the said purchase and execute the final sale deed and any claim / objection made thereafter shall not be entertained.

Sd/- **Adv. Parshuram S. Madval**
9, Le Brang Apartment,
Near Mapusa Clinic Hospital, Mapusa, Goa


# मयत कायसुवकर यांच्या कुटुंबीयांना मदतीचा धनादेश

साखळी, दि. ४ (प्रतिनिधी) :

सेझा गोवा कामगार संघटनेतर्फे मयत नवनाथ कायसुवकर यांच्या कुटुंबियांना तात्काळ आर्थिक मदत दिली आहे. सेझा कामगार संघटनेचे सरचिटणीस रमेश हरिश्चंद्र सिनारी यांच्या हस्ते आर्थिक मदतीचा रु. ३ लाख ४२ हजारचा धनादेश मयत कामगार नवनाथ कायसुवकर यांच्या पत्नी नेहा नवनाथ कायसुकर यांच्याकडे सुपुर्द केला. यावेळी संघटनेचे उपाध्यक्ष अनंत गावस यांचीही उपस्थिती होती.

सेझा गोवा संघटनेतर्फे संघटनेमधील एखाद्या कामगाराचा मृत्यू झाल्यास संघटनेतील सदस्यांतर्फे मदत निधी गोळा करून मयताच्या कुटुंबीयांना तात्काळ मदत दिली जाते. कामगाराचा मृत्यू झाल्यास कंपनीचे पैसे व एलआयसीचे पैसे कागदोपत्री सोपस्कारामुळे मिळण्यास विलंब होत असल्याने संघटनेतर्फे मयताच्या कुटुंबीयांना तात्काळ मदत म्हणून हा मदत निधी सर्व सदस्यांतर्फे गोळा करुन दिला जातो जेणेकरून त्या कुटुंबाला तात्काळ आर्थिक आधार मिळत असतो, अशी माहिती सेझा गोवा कंपनीच्या कामगार संघटनेचे गेली २६ वर्षे सरचिटणीसपद भूषविणारे रमेश हरिश्चंद्र सिनारी यांनी सांगितले. संघटनेने कोविड काळात इतर कंपन्या कामगार कपात, पगार कपात करीत असताना सेझा कंपनीच्या व्यवस्थापनाकडे यशस्वी बोलणी करून सेझा कामगार संघटनेने कामगारांचा पगारवाढ करून घेतला आहे. कोविड, लॉकडाऊन काळात संघटनेने कामगारांना जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा केला होता. संघटना कंपनीच्या हिताचे असंख्य निर्णय व्यवस्थापनाला विश्वासात घेऊन करत, अशी माहिती सिनारी यांनी दिली.



डिचोली : मयत कामगार नवनाथ कायसुवकर यांच्या पत्नी नेहा कायसुवकर यांच्याकडे मदतनिधीचा धनादेश सुपूर्द करताना संघटनेचे सचिव रमेश हरिश्चंद्र सिनारी. सोबत उपाध्यक्ष अनंत गावस.